Vol 4 Issue 6 Dec 2014 ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-4 | Issue-6 | Dec-2014
Available online at www.aygrt.isrj.org

GRT

# *1990 नंतरच्या दलित कवितेतील विद्रोह*

***पवळे नवनाथ ज्ञानोबा***

कालिकादेवी कला, वाणिज व विज्ञान, महाविद्यालय, शिरूर कासार जि. बीड

***सारांश :*** 1960 नंतर मराठी साहित्यात विविध साहित्य प्रवाहाची निर्मिती झाली या मध्ये दलित साहित्याचाही उगम झालेला दिसून येतो. 1960 पूर्वी जे साहित्य लिहीले जात होते ते बहुतेक पांढरपेशा वर्गातील साहित्यिकांनी लिहीले आहे. हजारो वर्षापासून येथील समाजव्यवस्थेच्या जोखडाला बांधून दलितावर अन्याय अत्याचार करण्यात आला, हा अन्याय अत्याचार निमुटपणे सहन करण्यापलीकडे दलित माणूस काही करू शकत नव्हता. पण 1960 नंतर जे दलित साहित्य लेख केले जाऊ लागले. त्यामध्ये आपल्याला बदल जानवू लागला त्याचे कारण असे की, 1980 नंतरची दलित कविता अभिव्यक्ती आणि भाषेच्या बाबतीत वेगळया वळणाने जाऊन आपली स्वतंत्र नवी ओळख निर्माण करताना दिसते. तात्पर्य 1990 अगोदरची कविता आणि नंतरची दलित कविता यांच्यात मुलभूत फरक जाणवतो. दलित कवितेच्या निर्मिती पासून अद्याप पर्यंतच्या प्रवासातील ठळक नोंदी प्रस्तुत शोधनिबंधातून मांडण्याचा मी प्रयत्न केला आहे.

***प्रस्तावनाः—***

मानवी जीवन प्रवाही आहे आणि स्थित्यंतर हा निसर्ग नियम आहे. एकूण दलित कवितेचे अवलोकन केल्यानंतर असे प्रत्ययाला येते की, 1980 नंतर ज्या कवीनी दलित कविता लिहिली ती कविता आणि पहिल्या कवीची अर्थात 1980 आगोदरची कविता यांच्यात कमालीचा फरक जाणवत आहे. महेंद्र भवरे म्हणतात त्या प्रमाणे ''1980 नंतर दलित कवितेने नवे वळण घेतले आहे. भुजंग मेश्राम, अरूण काळे, लोकनाथ यशवंत, वाहरू सोनवणे, राम दोतोंडे, दिपक त्रिभुवन, अविनाश गायकवाड, माधव सरकुंडे, आनंद गायकवाड, अमोल बागुल, प्रकाश भोगले इत्यादी या पिढीने दलित कवितेची सशक्त परंपरा निर्माण केली. अनेक अर्थांनी दलित कविता समृध्द करून नवे आयाम प्राप्त करून दिले आहेत. इतिहास आणि वर्तमानाची सांगड घालणाऱ्या या कवितेने समकालीन जीवन आणि संस्कृतीचे अनेक पदर उलगडून दाखवले आहेत. सांस्कृतिक संघर्ष चितारताना आर्य – अनार्य, ब्राम्हण – श्रमण, मूलनिवासी आणि मूलतत्ववादी व्यवस्था, नगरी – महानगरी संवेदने पासून झोपडपट्टी आणि झोपडपट्टीपर्यंतचे लोकजिवनाचे मानस तसेच सामाजिक, राजकीय, वास्तवाचा अनेक स्तरीय संघर्ष चित्रित केला आहे.''

आत्मनिष्ठ अनुभवांची प्रचंड विद्रोहात्मक अभिव्यक्ती असे दलित कवितेचे स्वरूप राहिलेले आहे म्हणून ती इथल्या समाजव्यवस्थेला, संस्कृतीला आणि देशाला नकार देत संघर्षाचा पावित्रा घेताना दिसते. यामध्ये तिला इष्ट असा बद्दल हवा आहे. नामदेव ढसाळ म्हणतात.

"मी हे सारं काही बोलणार नव्हतो पण माझे हात जागे झालेत
हजारो वर्ष मी होतो खंगत.
या गुहा – गुहांतल्या प्रचंड अंधारात
कालच तो गुहेच्या तोंडाशी ठेवून गेला आहे
पिसाळलेला जाळ .............
मी शिलगावीत जाणार आहे या पुढचा काळ"

अशाप्रकारे ही कविता विद्रोहाची भाषा करू लागते. उदाहरणादाखल जरी नामदेव ढसाळांच्या ओळी घेतल्या तरी सर्व कवींची कविता अशाच प्रकारची आक्रमक फवित्रा घेते.

1950 पासून दलित कविता लिहू लागले, वेदनेचा हुंकार म्हणजे कविता, दुःखाचं गाणं म्हणजे. दलित कविता, व्यथा, वेदना, अस्वस्थता आणि व्यवस्था नाकारणारी शब्दरचना म्हणजे दलित कविता असे म्हणता येईल 1958 मध्ये मुंबईमध्ये पहिले

दलित साहित्य संमेलन भरले होते. त्या संमेलनाच्या उदघाटनपर भाषणात आण्णाभाऊ साठे म्हणाले होते की, '' ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून दिन दलित श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे.'' अशी उद्‌घोषणा करन दिन दलिताबरोबर श्रमिकाचे महत्व पटवून दिले.

1990 नंतरच्या कवितेचा विचार करताना प्रकाष मोगले यांच्या 'दंभ स्फोट' या काव्यसंग्रहाचा विचार प्रामुख्याने करावा लागतो. धगधगते वास्तव सत्य ही कविता मांडते विद्रोहाची आग घेऊन ही कविता अवतरते. प्रकाश मोगलेंची कविता येथील समाजव्यवस्थेला तर नाकरतेच, परंतु स्वतःला दलित कवि, दलित नेते समजणाऱ्या नेत्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी विचाराची तडजोड करून मनुजवैरी व्यवस्थेच्या दावणीला जाऊन बसले आहेत. त्यांच्या विरूध्द ही कविता विद्रोह करते.

'' परवा संदेश यात्रेत
हेडगेवारांच्या शेजारी बाबासाहेब दिसले
अन् ही बौध्दिक छिनाली पाहुन मला हसू फुटले
हासत हासत त्यांना एक कचकचीत शिवी दिली.''

(दंभस्फोट : पृ.क्र. 12)

वर्णव्यवस्थेचा पुरस्कार करणारे हेडगेवार त्यांच्या विचाराचे अपत्य असलेले राजकीय पक्ष या पक्षातील व्यक्तिशी बाबासाहेबांचे अनुयाची हात मिळवणी करतात. हे वास्तव सत्य प्रकाश मोगले मांडतात. हा सगळा प्रकार म्हणजे मोगलेंना विरोधाभास वाटतो. हा बंडखोरपणा, विद्रोह, नकार याचे दर्शन यांच्या कवितेत घडते. उपहास, उपरोध, बंडाचे निखारे राग, द्वेष ओकताना कवी दिसतो. दलित कवी आंबेडकरी विचाराशी बदफैली करीत आहेत. हे कवींना सहन होत नाही म्हणून कवी लिहितो.

''येवढे ढिसाळ असाल
असं वाटलं नव्हतं.
पण उशीरा का होईना कळले
तुमचेही हात बेईमानीने मळले.
तुमच्या गद्दारीने किती तरी गर्भ गळले ''

(दंभस्फोट : पृ.क्र. 61)

प्रकाश मोगले हे या काळातील महत्वाचे कवी येथील व्यवस्थेविषयी तर बंडाची भाषा वापरतातच परंतु जे दलित स्वतःच्या स्वार्थासाठी आंबेडकरी चळवळीला आंबेडकरी विचारधारेला विरोधी गटाच्या दावणीला बांधले आहेत. अशा लोकांविषयी ते विद्रोह करतात. ही कविता बंडाची, विद्रोहाची उत्कट कविता आहे. शिव्याशाप, वैताग, तिरस्कार, उरबडेवपणा यांच्या कवितेत आपणांस पहावयास मिळतो. वास्तवसत्य मांडताना मोगलेची कविता आपले कवितापण हरवून बसत नाही. ती कवित्वपणाला अधिक जपते हे तितकेच खरे !

प्रकाश मोगलेची कवितेविषयी श्रीराम गुंदेकर लिहितात ''दंभस्फोट मधील कवितांची दोन गटात वर्गवारी करता येते.
1.भगवी कर्मठ जनद्रोही, प्रवृत्ती अधोरेखित करणाऱ्या कविता.
2.दलित पुढारीपणाचं दुंभगलेपण अधोरेखित करणाऱ्या कविता हे केलेले गुंदेकरांचे वर्गीकरण मला योग्य वाटते.'' (दंभस्फोट : पृ.क्र. 71)

प्रकाश मोगलेंच्या कवितेला बहुविध संदर्भ लाभले आहेत. त्यामुळे ती प्रखर बनते. यांचे कारण या व्यवस्थेत आहे. म्हणून या व्यवस्थेला ती नाकारते. समताधिष्ठीत समाजरचना निर्माण झाली पाहिजे. सामाजिक न्याय, सामाजिक बांधिलकी, समता, स्वातंत्र्य बंधुभाव हे भारतीय संविधानाने प्रमाण मानलेल्या मुल्यांचा ती पुरस्कार करते. समग्र समाजपरिवर्तन झाले पाहिजे ही कवीची भूमिका आहे.

दलित ऐक्याची भावना व्यक्त करणारी कविता, राम दोतोंडे यांची आहे. वेगवेगळया गटातटात अडकलेल्या दलित नेत्यांना राम दोतोंडे यांची कविता आवाहन करते.

उदा :– ''या नारे चवदार तळयाच्या पाण्यावर
ज्याची त्यांची खुराडे सोडून
पणी लाल होईल
पाणी निळ होईल
पाणी माणूस होईल.''

दलित ऐक्याशिवाय समाजात परिवर्तन घडू शकत नाही. आपआपसातील गटतट, जात, पोटजात, स्वार्थ, अहंकार बाजूला सारून निळया झेंडयाखाली जोपर्यत दलित येणार नाहीत. तोपर्यत दलित ऐक्य होवू शकणार नाहीत. समाज बदलासाठी एक संघता आवश्यक असते. असा कवींचा दृढ विश्वास आहे.

विश्वलक्ष कालेकर या काळातील महत्वाचे कवी 'महायुध्द' नावाचा त्यांनी कविता संग्रह लिहिला, समाजातील वास्तवावर कालेकरांची कविता प्रकाश टाकते. ज्या देशात दुभंगलेपण, विषमतावादी समाजरचना असते तेथे समता प्रस्थापित होऊ शकत

नाही. सामाजिक स्वातंत्र या देशातील लोकांना आणखीही मिळाले नाही. स्वातंत्र, समता, बंधुता, व सामाजिक न्याय राज्यघटनते पुरतेच मर्यादित आहे असे कवीला वाटते.

''या देशात माणसा माणसात
दुंभगलेपण असेल तर
स्वतंत्र नि अखंड देश राहण्याचा
अधिकारच ते नाकारतील.........

भारताच्या राष्ट्रपतीने दोन हजार वीस पर्यत भारत महासत्ता बनेल अशी अपेक्षा व्यक्त केली, ज्या देशात , जात, धर्म, वंश, आर्थिक स्तर यात दुभंगलेपणा आहे. तो देश स्वतंत्र आणि अखंड कसा राहू शकेल ? असा प्रश्न कविला पडलेला आहे. समाजातील दाहक वास्तव कवी प्रखरपणे मांडतो. भारत माझा देश आहे. सारे माझे बांधव आहेत असे फक्त शाळेतील मुलांच्या तोंडून व अधिकारवाणीने म्हणून घेतात. विश्वाला कालेकरांची कविता वाचकाला अंतर्मुख करायला लावणारी आहे. अनुभवाचे दाहक निखारे घेऊन जन्माला आलेली कविता आहे.

या काळातील महत्वपूर्ण कवी म्हणले डॉ. शिवाजी जवळगेकर हे आहेत. 'कळप' ''योध्दे फितूर झालेत'' असे दोन काव्यसंग्रह त्यांनी लिहिले.

जवळगेकरांची कविता राजकारणातील गलिच्छपणावर भाष्य करते, समाजकारण आणि राजकारण करणारे स्वतःला श्रेष्ठ समजतात. समाजापेक्षा मोठे आहोत असे मिरवित असतात. अशा अहंकारी, स्वार्थी, राजकर्त्यांचे धिंडोळे कवी काढतो. ज्यांच्याजवळ स्वाभिमान नाही, राजकारण आणि समाजकारण करण्याची दृष्टी नाही, स्वतःच्या स्वार्थासाठी जिथे तिथे गुलाम होताना दिसतात. समाज हितापेक्षा वैयक्तिक हित साधण्याचा प्रयत्न करतात, अशा आत्मकेंद्री, आत्मप्रौंढी, राज्यकर्त्यांना 'गाबुळे' ही प्रतिमा वापरलेली आहे. शिवाजी जवळगेकरांची कविता राजकारणातील बदलत्या स्थितीगतावर प्रकाश टाकते. त्यांची कविता उत्कट पण संवेदनशील आहे. अर्थघनपणा नवीन प्रतिक प्रतिमांचा वापर चारोळी सादृश्य रचना हे त्यांच्या कवितेचे बलस्थान आहे. आंबेडकरी चळवळीचे मारेकरी याच चळवळीचे नेते आहेत जवळगेकरांची कविता परिवर्तनवादी चळवळ तसेच समकालीन राजकारणावर चिंता आणि चिंतन करते. सामाजिक ऐक्य झाले पाहिजे हीच अपेक्षा कवी व्यक्त करतो.

'' असे भांबावून सर्वच पळू नका
नवं नवे गांव एकीने बांधायचे आहेत.
मनुष्य शापाने जातीच्या तापाने उसवलेली मन
नव्या सिध्दांताच्या दोऱ्याने सांधायची आहेत.
नको भेद, नको खेद
नव्या समाजाची स्वप्न रांदायची आहेत.''

समतावादी गांव, जातीविरहीत समाजरचना, मानवतावादी सिंध्दातांची नव्याने मांडणी करून माणूस हेच मुल्य माणणाऱ्या नव्या समाजाची उभारणी करायची आहे. परिवर्तनाची अपेक्षा उरी बाळगणाऱ्या कवीची ही कविता आहे. भेदा खेदाच्या वर्तुळातून समतावादी गांवाची उभारणी करण्यासाठी परिवर्तनवादी चळवळी पुढे सरसावल्या पाहिजेत अशी अपेक्षा कवीची आहेत.

''आज दुबळा माणुसही जागा होत आहे
समतेचा पक्का धागा होत आहे.
उद्याच्या नव्या माणसासाठी
आजच समतेची गाणे गात आहे.

सामान्य माणूसही आपल्या अस्मितेसाठी, अस्तिवासाठी जागृत होत आहे. अनेक जातीच्या वेगवेगळया संघटना निर्माण होत आहेत. सगळयाच समतेच्या चळवळी एका धाग्याने बांधणे आवश्यक आहे. समता प्रस्थापित करण्यासाठी एकत्वाची जाणीव कवीला आहे.

' रमेश विवेकी' या काळातील महत्वाचे कवी त्यांनी तमारोहक, सुर्यास्तव हे दोन काव्यसंग्रह लिहिले. ते एक संवेदनशीलपणाचे कवी सामाजातील वास्तव अतिशय सुक्ष्मपणे आणि तितक्याच निर्भीडपणे त्यांनी मांडले आहे. त्यांची कविता वाचकाला अस्वस्थ करते. समाजातील वेगवेगळया घटकांवर बारकाईने प्रकाश टाकला आहे. त्यांची कविताही अनुभवाची कविता आहे. डोळयांनी पाहिलेली घटना, प्रसंग ते सहजपणे तितक्याच ताकदीने मांडतात. स्वतःला श्रेष्ठ समजणाऱ्या जातीच्या माणसाची तसेच भिकाऱ्यापासून धनदांडग्यापर्यंत लोकांची मानसिकता कशी बुरसटलेली आहे. त्यांचा सुक्ष्म वेध कवी 'जात' या कवितेत घेतो.

'' रागानं म्हतारी ओरडली
तुला लाज वाटत नाही का ?
फेकुन पैसे दयायला ?
मी काही महारामांगाची नाही
फेकलेले पैसे घ्यायला.''

दलितांविषयी श्रीमंता पासून ते भिकाऱ्यापर्यंतचा द्वेष आणि तिरस्कार दलितांकडे पाहण्याचा हिणकत दृष्टिकोण आजही थांबलेला नाही. ही खंत कवी व्यक्त करतो.

स्वातंत्र्याने काय दिले ? हा प्रश्न कवी येथील व्यवस्थेला विचारतो, भूक, दारिद्रय, लाचारी, बेकारी, भष्ट्राचार या समस्येच्या संकटात हा देश सापडलेला आहे असे कविला वाटते कवी लिहितो.

''भुक, गरिबी, अन् बेकारीवर
भष्ट्राचाराचे राज्य आले.
नोकरीच्या मृग जळाला
बेकार सारे धावू लागले ''

शैक्षणिक क्षेत्रातील भष्ट्राचार त्यामुळे तरूणांची नौकरीसाठी होणारी वाताहत याचे सुक्ष्म दर्शन या कवितेत घडते. नौकरी म्हटले की पैसा, वशिलेबाजी, जात, संस्थाचालक, किंवा त्यांच्या नातेवाईकांच्या मुलीशी लग्न याशिवाय नौकरी मिळत नाही हे वास्तव सत्यकवी प्रांजलपणे मांडतो.

प्रा. मारोती कसाब यांचे ''पोरगं शेकत बसंलय' हा काव्यसंग्रह या व्यवस्थेतील अंधाधुंदीवर प्रकाश टाकताना दिसतो. शिक्षणामुळे स्वाभिमानाने राहता येत नाही. गुणवत्तेला कुणी विचारत नाही. शिक्षणामुळे आर्थिक प्रश्न सुटत नाही. शिक्षण माणसाला जगायला बळ देत नसेल, उलट पदोपदी अवमान, अपमानच शिक्षित तरूणाच्या पदरी पडत असेल तर शिक्षणाचा आणि पदव्या मिळविलेल्या प्रमाणपत्राची तर काय आवश्यकता आहे ? असे कवीला वाटते तेव्हा कवी लिहितो.

'' आता ............
पेरंग शेकत बसलंय
समद्या डिगऱ्या पेटवून
निदान तेवढीच ऊब माय बापाच्या थरथरत्या देहाला''

पदव्यांचा उपयोग कशासाठी, कुणासाठी घ्यायचा याचा अर्थ कवीनी उपरोक्त काव्य पंक्तीत सांगितलेला आहे. व्यथा, वेदना, दुःखाचं गाठोडं पाठीवर असताना कवीची कविता आक्रस्ताळेपणा धारण करीत नाही. आपल्या भोग वाटयाला जबाबदार ही व्यवस्था आहे म्हणून आपले अनुभव सरळ सोप्या शब्दात कवी मांडून जातो.

सतीश नाईकवाडे या काळातील एक विद्रोही कवी 'घाव' हा त्यांचा महत्वपूर्ण काव्य संग्रह या व्यवस्थेवर कित्येक शतकापासून घाव चालू आहेतच, तरी ही व्यवस्था ढिली होऊ शकत नाही. म्हणून या जातीयवादी व्यवस्थेवर वारंवार घाव घातला पाहिजे असे कवीला वाटते व्यवस्थेने नाकारलेल्या तरीही ही व्यवस्था बदलू पाहणारा हा धाडसी कवी आहे. कवीचे जीवन एक संघर्षाची लढाई आहे. माणसं बदलली परंतु मानसिकता बदलली नाही, डोके बदलले परंतु विचार बदललेले नाहीत. हा विचार कवी कवितेत मांडतो.

'' हे शेंदुरातल्या दगडा ११
त्याला लालबुंद शेंदारानं
तुझं दोन्ही डोळ झापलंय
ज्यानं तुला देवपण दिलं
त्यांला मात्र पायरीवरच ठेवलंय
थ्यू ११ तुझ्या देवपणावर
तुझं देवपण तर म्या
बुटानं, तुडवलंय.''

ज्यांनी देशाला घडविल ज्यांनी देवाची मुर्ती तयार केली त्या मुर्तीला स्पर्श करण्याची मुबा दलितांना नाही. यामुळे कवी विद्रोहाने म्हणतो अशा देवाला मी बुटानं तुडवलंय असा विद्रोह, त्यांच्या कवितेतून येताना दिसतो.

***संदर्भ ग्रंथ :–***

1) दलित साहित्य प्रेरणा कवी स्वरूप – डॉ. वसंत डोळस
2) दलित कविता – म. सु. पाटील
3) निळी पहाट – रा. ग. जाधव
4) कळप – शिवाजी जवळगेकर
5) दंभ स्फोट – प्रकाश मोगले
6) पाखंड – आदिनाथ इंगोले
7) दलित कवितेतील नवे वाङ्मय – भवरे महेंद्र
8) दलित कविता : एक दर्शन – कुंभोजकर ललिता

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org